■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – ३२३ ■ रविवार दि.१० ऑगस्ट २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 323 ■ Sunday Dt. 10 August 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभचा स्फोटक दणका!

# शिक्षक भरती व वेतन घोटाळा चव्हाट्यावर; प्रशासन हादरले!

**एसआयटी तपासाच्या धास्तीने भगवान फुलारींची धडपड, तपास चुकवण्यासाठी मोर्चाचा खेळ; मोर्चासाठी संघटनांवर दबाव टाकल्याची जोरदार चर्चा?**

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

**संघटना नाही आल्या तर परिणाम भोगावे लागतील; फुलारींची धमकी चर्चेत, मोर्चाच्या आडून भ्रष्टाचार झाकण्याचा प्रयत्न?**


# बीडच्या शिक्षण विभागातील घोटाळ्यावर कारवाईची चिन्हे; तीन अधिकाऱ्यांची एसआयटी समिती लवकरच दाखल होणार बीडला

## शिक्षण विभागातील अधिकारी-कर्मचारी तसेच पे युनिटसह प्राथमिक व माध्यमिक चे अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले, कोणत्याही क्षणी कारवाईची शक्यता?

## शिक्षण घोटाळा तपासात 'बिग गन्स' पुण्याचे विभागीय आयुक्त आणि राज्याचे पोलिस महानिरीक्षक थेट बीडला येणार?







बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्हा शिक्षण विभागात उघडकीस आलेल्या शिक्षक भरती घोटाळा व थकीत वेतन घोटाळा प्रकरणी आता चौकशीची गती वाढणार आहे. या गंभीर प्रकरणांचा सखोल तपास करण्यासाठी शासनाकडून तीन वरिष्ठ अधिकाऱ्यांची विशेष तपास पथक (एसआयटी) नेमण्यात आली असून ही समिती लवकरच बीडमध्ये दाखल होणार आहे. सदर प्रकरणात अनेक अनियमितता, बनावट कागदपत्रांच्या आधारे भरती, तसेच काही शिक्षकांचे महिनोनमहिने थकीत वेतन प्रकरणातील आर्थिक गैरव्यवहार उघड झाले असल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. प्राप्त माहितीनुसार, एसआयटी समिती संबंधित फाईल्स, दस्तऐवज, तसेच जबाब नोंदवून संपूर्ण अहवाल शासनाला सादर करणार आहे. या चौकशीत दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई होणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षण विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांमध्ये सध्या मोठी हालचाल सुरू झाली आहे. तपास पथकाच्या आगमनामुळे बीडच्या शिक्षण विभागातील या वादग्रस्त प्रकरणावर पडदा उठणार की नवे खुलासे समोर येणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, शिक्षण विभागातील अधिकारी-कर्मचारी, तसेच पे युनिटचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अधिकारी यांच्या खांद्यावर जबाबदारीचे ओझे अचानक वाढले आहे. या प्रकरणात अनेक गैरव्यवहार आणि दस्तऐवजी अनियमितता उघड झाल्याने संबंधित अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले असून, कोणत्याही क्षणी निलंबन, नोंदवहीत नोंद किंवा अन्य प्रशासकीय कारवाई होऊ शकते, अशी चर्चा जिल्ह्यात सुरू आहे. या तपासाच्या धास्तीने शिक्षण विभागात सध्या प्रचंड खळबळ माजली असून, जिल्ह्यातील शिक्षक व कर्मचाऱ्यांचेही डोळे या कारवाईकडे लागले आहेत.

शासनाने नेमलेल्या विशेष तपास पथकात (एसआयटी) पुण्याचे विभागीय आयुक्त तसेच राज्याचे पोलिस महानिरीक्षक यांचा समावेश असणार असल्याची माहिती मिळाली आहे. या पथकासोबतच शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी देखील बीडमध्ये दाखल होऊन संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करणार आहेत. जिल्ह्यातील शिक्षक भरती प्रक्रियेत झालेल्या अनियमितता, बनावट कागदपत्रांचा वापर, तसेच वेतन वितरणातील गैरव्यवहार या सर्व बाबींची तपासणी होणार आहे. सदर तपासात दोषी आढळणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर निलंबनासह कठोर प्रशासकीय कारवाई होऊ शकते, अशी चर्चा आहे. उच्चस्तरीय अधिकाऱ्यांच्या थेट सहभागामुळे या तपासाला अधिक वजन मिळाले असून, जिल्ह्यातील शिक्षण विभागात प्रचंड खळबळ माजली असून, या घोटाळ्याच्या तपासाला गती मिळण्यामागे एक महत्त्वाचा धागा समोर आला आहे. इंजिनिअर सादिक इनामदार यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, प्रधान सचिव रणजीत देवल तसेच शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह यांच्याकडे ठोस पुराव्यानिशी तक्रार दाखल केल्यामुळेच शासनाला विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करावे लागले. इनामदार यांनी सादर केलेल्या तक्रारीत बनावट स्वाक्षऱ्यांचे नियुक्ती आदेश, भरतीतील गैरव्यवहार, वेतन वितरणातील अनियमितता आणि आर्थिक भ्रष्टाचार याबाबत ठोस कागदपत्रे, पुरावे आणि साक्षीदारांची माहिती जोडली होती. या तक्रारीची गांभीर्याने दखल घेत उच्चस्तरीय हालचाली सुरू झाल्या.

### मयत शिक्षण अधिकारी सानप यांच्या नावाने बनावट स्वाक्षऱ्या; विस्तार अधिकारी शेळके यांच्यावरही एसआयटीची चौकशी?

मयत शिक्षण अधिकारी सानप यांच्या नावाने बनावट स्वाक्षऱ्या करून कागदपत्रे तयार करणाऱ्या विस्तार अधिकारी शेळके यांच्यावरही विशेष तपास पथक (एसआयटी) कसून चौकशी करणार असल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणामुळे शिक्षण विभागातील भ्रष्टाचार आणि अनियमिततेचा स्तर किती खोलवर गेला आहे, याचे धक्कादायक चित्र उभे राहिले आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या बनावट स्वाक्षऱ्यांचा वापर करून काही फाईल्स मंजूर करण्यात आल्या असल्याचा संशय असून, एसआयटी याबाबत पुरावे गोळा करत आहे. दरम्यान, या चौकशीत दोषी आढळल्यास विस्तार अधिकारी शेळके यांच्यासह संबंधित इतर अधिकाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई होण्याची शक्यता आहे.

### शिक्षक भरती व थकीत वेतन घोटाळा प्रकरणात प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्या चौकशीचे संकेत?

भगवान फुलारी यांचे काम पाहणारे प्रभारी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांचीही एसआयटी मार्फत कसून चौकशी होणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. सदर घोटाळ्यांमध्ये भरती प्रक्रियेत अनियमितता, बनावट कागदपत्रांचा वापर आणि वेतन वितरणातील गैरव्यवहार उघड झाल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ माजली आहे. येणारे एसआयटी पथक सर्व संबंधित अधिकाऱ्यांचे जबाब नोंदवणार असून, या प्रक्रियेत बेडसकर यांच्यासह इतर जबाबदार अधिकाऱ्यांचीही चौकशी अपेक्षित आहे. तपास पथकाच्या या हालचालींमुळे शिक्षण विभागात मोठी हालचाल सुरू झाली असून, दोषी आढळल्यास कठोर प्रशासकीय कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यामुळे जिल्ह्यातील शिक्षण विभागातील वातावरण चांगलेच तापले आहे.

### एसआयटी तपासाच्या भीतीने दबाव तंत्र? शिक्षण अधिकारी भगवान फुलारी यांचे मोर्चासाठी संघटनांवर दबाव टाकल्याची चर्चा?

शक्षक भरती घोटाळा आणि थकीत वेतन घोटाळा प्रकरणात एसआयटी तपास लागल्यानंतर, काही वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये प्रचंड हालचाल सुरू झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शिक्षण अधिकारी (प्राथमिक) भगवान फुलारी आणि माध्यमिक शिक्षण अधिकारी प्रिया राणी पाटील यांनी बीड जिल्ह्यातील विस्तार अधिकारी संघटना, केंद्रप्रमुख संघटना आणि अधीक्षक संघटना यांना उद्या शिक्षण आयुक्त, पुणे येथे मोर्चात सहभागी होण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.

सूत्रांच्या माहितीनुसार, या मोर्चामागे उद्देश असा आहे की, भ्रष्टाचार प्रकरणातील तपास थांबवण्यासाठी किंवा विलंब करण्यासाठी शासनावर दबाव आणावा. यासंदर्भात भगवान फुलारी यांनी जिल्ह्यातील अनेक संघटनांना मोर्चात आला नाही तर कोणालाही सोडणार नाही अशा शब्दांत धमकीचे फोन केल्याची चर्चा आहे. या प्रकरणावर जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली असून, जर खरोखरच काही संघटना या मोर्चात सहभागी झाल्या, तर त्यांच्यावर आयुक्त कार्यालय तसेच शासन स्तरावर कारवाई होण्याचे संकेत आहेत. दुसरीकडे, प्रामाणिक अधिकारी व संघटना या मोर्चापासून अंतर राखण्याच्या तयारीत असल्याचे समजते. एसआयटी तपास सुरू असताना असा दबाव तंत्र वापरण्याच्या हालचालींमुळे संपूर्ण शिक्षण विभागात चर्चा रंगली आहे, तर जिल्ह्यातील नागरिक आणि शिक्षकवर्ग या घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

### महाराष्ट्र आरंभचा दणका! निर्भीड बातम्यांनी शिक्षक भरती व वेतन घोटाळा चव्हाट्यावर; प्रशासनाला जाग?

**शिक्षण विभागातील शिक्षक भरती घोटाळा आणि थकीत वेतन घोटाळा हे गंभीर प्रकरण सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ या वृत्तपत्राने निर्भीडपणे मांडल्यामुळे आता प्रशासनाला जाग आली आहे. सलग धडक बातम्या, पुरावे आणि थेट जबाबदारी दाखवणारे वृत्तांकन यामुळे हा घोटाळा सर्वांसमोर आला असून, संबंधित अधिकाऱ्यांच्या भुवया उंचावल्या आहेत. या बातम्यांच्या दणक्याने शासन स्तरावर हालचाल सुरू झाली असून, विशेष तपास पथक (एसआयटी) नेमण्यात आले आहे. आता या पथकात पुण्याचे विभागीय आयुक्त, राज्याचे पोलिस महानिरीक्षक आणि वरिष्ठ शिक्षण अधिकारी सहभागी होऊन सखोल चौकशी करणार आहेत. महाराष्ट्र आरंभच्या या धाडसी पत्रकारितेमुळे केवळ घोटाळ्याचे धागेदोरेच समोर आले नाहीत, तर बनावट स्वाक्षऱ्यांचे नियुक्ती आदेश, मृत अधिकाऱ्यांच्या नावाने झालेली फाईल मंजुरी आणि वेतनातील आर्थिक गैरव्यवहार यासारखे धक्कादायक प्रकारही उजेडात आले आहेत. जिल्ह्यातील नागरिक, शिक्षक आणि प्रामाणिक अधिकारी यांच्यात आता एकच चर्चा आहे. महाराष्ट्र आरंभच्या उघडकीमुळे सुरू झालेल्या या तपासातून किती जणांवर गंडांतर कोसळणार.**

### बनावट स्वाक्षऱ्यांचे नियुक्ती आदेश मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश होणार?

**बनावट स्वाक्षऱ्यांचे नियुक्ती आदेश देणाऱ्या रॅकेटचा मोठा पर्दाफाश होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. काही अधिकाऱ्यांनी मृत किंवा सेवेत नसलेल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नावाने बनावट स्वाक्षऱ्या करून नियुक्ती आदेश तयार केले असल्याचा धक्कादायक प्रकार समोर येत आहे. विशेष तपास पथक (एसआयटी) सध्या या प्रकरणातील सर्व फाईल्स, आदेशपत्रे आणि संबंधितांच्या जबाबांची बारकाईने छाननी करणार असल्याचे बोलले जात आहे. या रॅकेटमध्ये शिक्षण विभागातील काही अधिकारी, पे युनिटमधील कर्मचारी आणि बाहेरील दलालांचा संगनमताचा संशय व्यक्त केला जात आहे. दोषींची नावे लवकरच जाहीर होण्याची शक्यता असून, त्यानंतर मोठ्या प्रमाणावर निलंबन व फौजदारी गुन्ह्यांची नोंद होऊ शकते. या घोटाळ्यामुळे जिल्ह्यातील शिक्षण विभागातील भ्रष्टाचाराचे जाळे उघडकीस येणार असून, सर्वांचेच लक्ष आता एसआयटीच्या हालचालींकडे लागले आहे.**

### वेतन अधीक्षक कार्यालयातील खटावकर व ढाकणे यांच्यावरही एसआयटीची चौकशी?

वेतन अधीक्षक कार्यालयातील खटावकर आणि ढाकणे यांचीही विशेष तपास पथक (एसआयटी) मार्फत चौकशी होणार असून, दोषी आढळल्यास कठोर कारवाईची शक्यता आहे. या अधिकाऱ्यांवर थकीत वेतनाच्या मंजुरी प्रक्रियेत गंभीर अनियमितता, संशयास्पद मंजुरी आदेश आणि आर्थिक गैरव्यवहारांचे आरोप आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, काही शिक्षकांच्या महिनोनमहिने थकित वेतनाच्या फाईल्स वेगाने हलवण्यासाठी दबाव टाकणे, तसेच काही प्रकरणांत 'विशेष मंजुरी' देण्यासाठी नियमबाह्य पद्धतींचा अवलंब केल्याचा संशय आहे. एसआयटी या दोघांकडून संबंधित फाईल्स, मंजुरी आदेशांची प्रत आणि बँक व्यवहारांची सविस्तर माहिती घेणार आहे. तपास पथकाच्या हालचालींमुळे वेतन अधीक्षक कार्यालयात प्रचंड खळबळ माजली असून, सर्वांचेच लक्ष आता चौकशीच्या पुढील टप्प्याकडे लागले आहे.

# जनावरावरील खरेदी विक्रीच्या बंदला राज्य खाटीक समाजाचा पाठींबा



## उद्या बीडमध्ये कुरेशी समाजाचा मेळावा

**बीड । प्रतिनिधी**

तथाकथीत गोरक्षकाच्या त्रासाला कंटाळून आणि पोलीस प्रशासनाकडून चुकीच्या कारवाया होत असल्याने कुरेशी समाजाने जनावरांच्या खरेदी विक्रीवर बहिष्कार घातलेला आहे. हा बहिष्कार अजुनही सुरूच आहे. या बहिष्काराला राज्य मुस्लिम खाटीक संघटनेने आपला पाठींबा दर्शवला असून या संदर्भात उद्या दि.११ ऑगस्ट रोजी सायं.६ वाजता बीडमध्ये मेळाव्याचे आयोजन करण्यात आले अशी माहिती खाटीक समाजाचे जावेद कुरेशी यांनी आज पत्रकार परिषदेत दिली आहे.

गेल्या काही दिवसापासून राज्यात खाटीक समाजाने जनावरांच्या खरेदी विक्रीवर बंदी घातलेली आहे. तथाकथीत गोरक्षकाने धुमाकूळ घालत व्यापार्यांना जाणीव पुर्वक त्रास देण्याचे काम सुरू केले आहे. तसेच पोलीस प्रशासनाकडूनही चुकीच्या कारवाया होत आहेत. खाटीक समाजाचा बहिष्कार अजुनही सुरूच असुन या बहिष्काराला राज्य मुस्लिम खाटीक संघटनेने पाठींबा दर्शवला असून या संदर्भात उद्या ११ सप्टेंबर रोजी सायं.६ वाजता आशिर्वाद लॉन्स या ठिकाणी मेळावा आयोजित करण्यात आला. या मेळाव्याला हाजी अराफत यांच्यासह आदींची उपस्थिती राहणार आहे. या मेळाव्यात पुकारलेल्या बंद संदर्भात चर्चा होणार आहे. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याकडे गोरक्षकांकडून होत असलेल्या त्रासाबद्दल आणि पोलिसांकडून होत असलेल्या अन्यायाबद्दल तक्रार करण्यात येणार असल्याचेही कुरेशी व इतर पदाधिकार्यांनी पत्रकार परिषदेत म्हटले आहे.

# शेतकऱ्यांनी बीबीएफ टोकन पद्धतीने सोयाबीन लागवड केल्यास उत्पादनात भरघोस वाढ : श्रीकन्या जाधव

### श्रीपतराववाडी येथे पाटोदा तालुक्यातील शेतकऱ्यांची अभ्यास सहल

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांनी बीबीएफ टोकन पद्धतीने सोयाबीन लागवड केल्यास सोयाबीन उत्पादनात भरघोस वाढ होऊन शेतकऱ्याची उन्नती होऊ शकते. एकरी १८ ते २१ क्विंटल सोयाबीन उतारा निघू शकतो. शेतकऱ्यांनी आधुनिक पद्धतीने शेती करावी असे वक्तव्य प्रगतशिल शेतकरी श्रीकन्या जाधव यांनी श्रीपतरायवाडी तालुका अंबाजोगाई येथे पाटोदा तालुक्यातील सहलीत आलेल्या महिला पुरुष शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या.



पाटोदा तालुक्यातील वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्टच्या शाश्वत उपजिविका विकास प्रकल्पा अंतर्गत ॲक्सिस बँकेच्या अर्थसहाय्याने पाटोदा तालुक्यातील ११ गावांची अंबाजोगाई तालुक्यातील श्रीपतरायवाडी येथील सौ श्रीकंन्या राजेंद्र जाधव यांच्या बी बी बी एफ व टोकन पेरणी सोयाबीन पिक निरिक्षण व कृषी विज्ञान केंद्र अंबाजोगाई येथे मार्गदर्शनसाठी शेतकरी अभ्यास सहल संपन्न झाली. श्रीकन्या जाधव पुढे बोलताना म्हणाले की शेतीमध्ये महिलांचा मोठा वाटा आहे. महिलांनी शेतीविषयक अभ्यास करणे काळाची गरज आहे.

सोयाबीन बीड जिल्ह्यातील मुख्य पीक आहे. परंपरागत पद्धतीने सोयाबीन सह इतर पिकाची शेतकरी पेरणी करतात या पद्धतीमुळे उत्पादन वाढ एकरी चार ते पाच क्विंटल उत्पादन मिळते आधुनिक पद्धतीने शेती केल्यास उत्पादनात भरघोस वाढ होऊ शकते. आम्ही एकरी २१ क्विंटल सोयाबीन उत्पादन काढतो.ही किमया बीबीएफ आणि टोकन पद्धतीने सोयाबीन लागवड केल्यामुळे झाली आहे. बीज प्रक्रिया आणि उगवण क्षमता याचे महत्त्व शेतकऱ्यांना सांगितले.

शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शेती करावी असे आवाहन श्रीकन्या जाधव यांनी केले. राजेंद्र जाधव यांनी पेरणी पासून ते काढणीपर्यंत मार्गदर्शन शेतकऱ्यांना केले. निंबोळी अर्क दशपर्णी अर्क यांच्या फवारणी कधी करावी. रासायनिक फवारणी कधी करावी त्याचे मार्गदर्शन केले. शेतीमध्ये योग्य नियोजन केल्यास उत्पादनात कशी वाढ होते हे त्यांनी शेतकऱ्यांना सांगितले. बीबीएफ टोकन पद्धतीने २०१६ पासून ते २०२४ पर्यंत सोयाबीन उत्पादनात कशी वाढ झाली त्यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले. फवारणी चिकट सापळे वापरून किड नियंत्रण कसे होते याचे महत्त्व सांगितले. सोयाबीनवर किड नियंत्रण करण्यासाठी शेतकऱ्यांनी सोयाबीनच्या चारी बाजूने मका एरंडी चवळी लागवड करावी असे आव्हान जाधव यांनी केले.

वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट पाटोदा विभाग टिम कैलास पन्हाळकर, अनिल पालवे, शेख युनुस, सोपान शिंदे, दादासाहेब बेदरे, प्रदिप सांगळे, भरत कवठेकर, गणेश रसाळ, संदिपान चव्हाण, आत्माराम गर्जे, बाळु चेपटे, राहुल राख टिम उपस्थित होते. तसेच कृषी विज्ञान केंद्र वरिष्ठ शास्त्रज्ञ प्रमुख डॉ. वसंतराव देशमुख, डॉ. प्रमोद रेणापुरकर, डॉ. कृष्णा कर्डिले, डॉ. नरेंद्र जोशी, सुहास पंखे, डॉ. रविंद्र कोरके यांनी मार्गदर्शन केले.

# भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा बीड तालुका अध्यक्षपदी सलिमभाई जहागिरदार यांची निवड

**बीड । प्रतिनिधी**

बालाघाटावरील चौसाळा येथील रहीवाशी व भाजपाचे सक्रिय कार्यकर्ते सलिमभाई जहागिरदार यांची भाजपा अल्पसंख्यांक आघाडी बीड तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली असुन ही निवड लोकनेत्या पंकजाताई मुंडे, मा.खा. प्रितमताई मुंडे यांच्या सुचनेनुसार जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, जिल्हा सरचिटणीस सर्जेराव तांदळे, भाजपा अल्पसंख्यांक मोर्चा महाराष्ट्र उपाध्यक्ष सलिम जहाँगिर, जिल्हा सचिव शांतीनाथ डोरले, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ शिराळे, जिल्हा कोषध्यक्ष चंद्रकांत फड, बीड तालुका अध्यक्ष अशोक दादा रसाळ, भाजपा अनुसुचित जाती मोर्चा बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर यांनी ही निवड केली आहे. सलिमभाई जहागिरदार हे गेल्या अनेक वर्षापासून भारतीय जनता पार्टीचे एकनिष्ठ कार्यकर्ते असुन त्यांनी चौसाळा परिसरासह बालाघाटावर अनेक कार्यकर्ते जोडले असुन वाडी, वस्ती, तांडयावर जावुन लोकसभा, विधानसभा निवडणुकीच्या काळात पक्षाचा प्रचार प्रसार मोठया प्रमाणावर केला आहे. अनेकांच्या सुख दुखात धावुन जाणारा कार्यकर्ता म्हणुन त्यांची ओळख असुन या कामाची पावती म्हणुन त्यांची भारतीय जनता पार्टीच्या अल्पसंख्यांक आघाडी बीड तालुका अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे बालाघाटासह चौसाळा परिसरातुन त्यांच्यावरती अभिनंदनाचा वर्षाव होत असून एका निष्ठावंत कार्यकर्त्याला न्याय दिल्याची चर्चा बीड तालुक्यासह बालाघाटावर होताना दिसत आहे.




# सागर इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेज, सिरसदेवीच्या वतीने तलवाडा पोलीस स्टेशन येथे रक्षाबंधनाचा कार्यक्रम अनोख्या पद्धतीने साजरा

**सिरसदेवी । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येथील सागर इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी रक्षाबंधन या सणानिमित्त तलवाडा पोलीस स्टेशन येथे जाऊन कर्तव्यदक्ष पोलीस अधिकाऱ्यांना राख्या बांधून रक्षाबंधन साजरा केला. याप्रसंगी तलवाडा पोलीस स्टेशनचे ए पीआय मनोज निलंगेकर सर व पोलीस उपनिरीक्षक कोळी साहेब व पोलीस उपनिरीक्षक गायकवाड साहेब अंमलदार काकडे साहेब अमलदार जावळे साहेब पोलीस अमलदार जाधव साहेब पोलीस अमलदार बहिरवळ इतर पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश होता.



याप्रसंगी विद्यार्थ्यांनी, पोलीस अधिकाऱ्याची मुख्य भूमिका काय? तसेच पोलीस कार्याबद्दल, सामुदायिक पोलिसींग, सुरक्षा आणि सुरक्षा दल, कायदा आणि सुव्यवस्था या सर्व मुद्द्यांवरील प्रश्न विद्यार्थीनींनी विचारले. व मा. मनोज निलंगेकर साहेबांनी विचारलेल्या प्रश्नावर विद्यार्थ्यांना समाधानकारक उत्तर देऊन त्यांचे मार्गदर्शन केले. आपल्या कार्यप्रणाली विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. पोलीस यंत्रणा कशी कार्य करते महिला व इतरांची सुरक्षा कशा पद्धतीने करते याविषयी सरांनी मार्गदर्शन केले.

खास महिलांसाठी महिलांच्या सुरक्षा करिता ११२ टोल फ्री क्रमांक वर संपर्क साधून यंत्रणेची मदत कशी मिळवता येते याची माहिती सांगितली. इयत्ता सहावी ,सातवी व आठवीच्या विद्यार्थ्यांनी पोलीस कर्मचाऱ्यांना राख्या बांधून रक्षाबंधनाचा कार्यक्रम अनोख्या पद्धतीने साजरा केला. २४ तास ड्युटीवर असणाऱ्या कर्तव्यदक्ष पोलीस स्टेशन तलवाडा येथील अधिकाऱ्यांना सागर इंग्लिश स्कूलच्या चिमुकल्या बहिणीने राख्या बांधून रक्षाबंधनाचा कार्यक्रम साजरा केला व सर्व तलवाडा पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांनी सागर इंग्लिश स्कूलच्या चिमुकल्या बहिणीला उज्वल भविष्य घडवण्यासाठी अभ्यास करण्याचे वचन घेऊन त्यांना वह्यांचे वाटप केले याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका पी.एम. सरिता मॅडम व इतर शिक्षक वृंद उपस्थित होते.

# ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिनानिमित्त जिल्हास्तरीय परिषद संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

टकारी ट्रायबल कम्युनिटीज् वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र या संघटनेच्या शाखा – उखंडा ता.पाटोदा जि.बीड येथे शाखा अध्यक्ष मच्छिंद्र दशरथ गायकवाड, शाखा उपाध्यक्ष मसु आश्रुबा गायकवाड, व शाखा सचिव तानाजी दशरथ गायकवाड, यांनी ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिनानिमित्त जिल्हास्तरीय परिषद आयोजित केला यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अँड नामदेव जाधव यांनी मार्गदर्शन केले. २१ जानेवारी २०१९ रोजी पुण्यामध्ये आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था येथे मोर्चा व उपोषन १८ जानेवारी २०२१ रोजी मंत्रालयासमोर व आझाद मैदान येथे उपोषण करुन हि शासन प्रशासने याची काहीही कारवाई केलेली नाही. पारधी जमातीचे पोट जमात असलेल्या टकारी जमातीचा भारतीय संविधान अनुच्छेद ३४२(१)नुसार महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित जमातीच्या यादीत अणुक्रमांक ३८ वर समावेश करण्याचे प्रकरण २०१६ पासून आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे प्रलंबित आहे. शासनाने हे प्रकरण त्वरित निकाली काढून भारत सरकारला शिफारस करण्यात यावी, असे या परिषदेत टकारी ट्रायबल कम्युनिटीज वेल्फेअर फेल्फेअर असोसिएशन संस्थापक राज्य अध्यक्ष अँड नामदेव जाधव यांनी जाहीरपणे सांगितले.

यावेळी उपस्थित विपुल गायकवाड, सुभाष जाधव, दगडु गायकवाड, माऊली गायकवाड, प्रकाश गायकवाड, भिमराव गायकवाड, मनीराम गायकवाड, देविदास गायकवाड, उखंडा ग्रामपंचायत सदस्य शिवाजी गायकवाड, उखंडा गावचे सरपंच संतोष झुणगुरे, जि.प. सदस्य प्रकाश कवठेकर, पदाधिकारी व समाज बांधव हे आहिल्या नगर व बीड जिल्हातुन बहुसंख्येने उपस्थित होते.

# लढवय्या भीमसैनिक कै. धम्मानंद मुंडे यांच्या स्मृतीदिन ; त्यानिमित्ताने त्यांच्या कार्याला दिलेला उजाळा

महाराष्ट्रात व बीड जिल्ह्या व परळी शहराची आंबेडकरी चळवळीची शान रिपाई आठवले गटाचे नेते कै. धम्मानंदजी मुंडे.या भूतलावर येणारा प्रत्येक माणूस हा काही काळ जगूनपुन्हा या जगातून कायमचा नष्ट होत असतो मनुष्याचे जीवन हे पाण्यातील बुडबुड्याप्रमाणे नाशिवंत नाश पावणारे निसर्गाच्या नियमाप्रमाणे या भूतालावरील सर्व सजीव सृष्टी कालांतराने नष्ट होतातप्रत्येक माणूस हा या भूमीवर जगत असताना आपल्या कार्याच्या जोरावर आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर आपण समाजामध्ये निर्माण केलेल्या आपल्या अजरामर कार्याच्या जोरावर आपलं स्वतःचं नाव अजरामर करण्याचं काम करत असतो. या समाज जीवनामध्ये अनेक लोक जीवन जगत असतात काही लोक हे किडे मकोड्यासारखे जीवन जगण्याचे काम करतात काही माणसांचं जीवनही अत्यंत हलाखीच्या व गरीबीच्या परिस्थितीमध्ये गेले असते काही माणसाच्या जीवनाला अर्थच उरलेला नसतो काही माणसाचं जीवन हे खरोखरच जीवन असूनही नसल्यासारखं जीवन असतं परंतु अशी काही माणसे या जगामध्ये निर्माण होऊन गेलेले असतात की आपण शून्यातून आपलं विश्व निर्माण करून लाथ मारिन तिथे पाणी काडीन या भूमिकेने जीवन जगून आपल्या नावाचा डंका संपूर्ण जगभर पसरवण्याचेकाम करत असतात परळी शहरांमध्ये देखील अत्यंत हलाखीच्या व दारिद्र्याच्या गरीबीच्या परिस्थितीमध्ये जीवन जगून आपण आपल्या समाजासाठी काहीतरी केलं पाहिजे हजारो वर्षापासून अत्यंत हलाखीचं दारिद्र्याचे गुलामीचे दलदलीत फसलेलं जीवन माणसांना माणसाला नाकारलेलं जीवन जगण्याचे काम ज्या समाजाने केलं त्या समाजाला आपण मानवतावादी विचाराकडे नेण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचा महान मानवतावादी विचार फुले आंबेडकरी चळवळीचा महान विचार भगवान गौतम बुद्धांचा जगाला युद्ध नको बुद्ध हवा स्वातंत्र्य समता बंधुत्व यांचा नारा देणारा बौद्ध धम्माचा संदेश प्रत्येकाच्या घराघरांमध्ये पोहोचवण्या साठी दलित समाजातील प्रत्येक माणसाने केला पाहिजे हा विचार प्रत्येकाच्या हृदयामध्ये तेवत ठेवण्यासाठी प्रत्येक माणसाने बौद्ध धम्माचा पताका प्रत्येक माणसाच्या हृदयामध्ये फडकत ठेवण्यासाठी तेवत ठेवण्यासाठी पुढे आले पाहिजे या विचाराने विचारलेला या विचाराने भारावून जाऊन या समाजाचे भलं करण्याचं काम करणारा दलित पँथर या विद्रोही व बंडखोर संघटनेच्या माध्यमातून अनेक गोरगरीब लोकांवर होणारे अन्याय अत्याचाराविरुद्ध धावत जाणारा भूमिहीनांना जमिनी मिळाव्यात यासाठी आंदोलनांमध्ये सक्रिय सहभाग घेणारा गायरान जमीन या दलितांना वाटप झाल्या पाहिजेत यासाठी अनेक आंदोलने मोर्चे काढून शासन दरबारी आवाज उठवण्याचे काम करणारा दलित पँथर या लढवय्या संघटनेच्या माध्यमातून मराठवाडा विद्यापीठासडॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मिळावे यासाठी रक्ताचे पाणी करून आपल्या शाहिरीच्या माध्यमातून घराघरातला माणूस नामांतर मिळावे यासाठी सज्ज व जागेकरण्याचे काम करणारा आपल्या शाहिरीच्या माध्यमातून मृतप्राय झालेल्या अनेक दलितांना संजीवनी देण्याचे काम करणारा प्रत्येक माणसाला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतिकारी विचाराची ठिणगी हातात देऊन क्रांतीसाठी प्रवर्तकरणारा आपल्या सुखमय संसाराची राख रांगोळी झाली तरी चालेल आपल्या घराची बरबादी झाली तरी चालेल आपलं आत्मबलिदान या समाजासाठी जरी झालं हुतात्मेयजरी आलं तरी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या नावासाठी पुढे येण्याचं काम आपण केलं पाहिजे या विचाराने भारावून जाऊन नामांतराच्या आंदोलनामध्ये सक्रिय सहभाग घेऊन मराठवाड्यातील प्रत्येक गावागावात खेड्यापाड्यामध्ये घराघरांमध्ये जाऊन नामांतरासाठी संघर्ष करण्याची भूमिका लोकांना पटवून देण्याचे काम करणारा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे महान तत्वज्ञान उराशी बाळगून येथील जातीयवादी प्रवृत्ती विरुद्ध लढून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या नामांतरासाठी पायाला भिंगरी बांधून नामांतर लढ्यात आपलं आयुष्य समर्पित करणारा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी येथील मृत झालेल्या दलित समाजाला आपल्या क्रांतिकारी विचारांनी संजीवनी देऊन येथील समाजाला येथील धर्मवाद जातिवाद कर्मकांड अनिष्ट चालीरीती परंपरा यांच्याविरुद्ध आवाज उठवण्याचे काम केलं हजारो वर्षापासून येथील बहुजन समाजाला दलित समाजाला येथील समाज व्यवस्थेने अत्यंत हलाखीचे जीवन जगण्यास भाग पाडले सामाजिक सांस्कृतिक राजकीय आर्थिक सर्व क्षेत्रांमध्ये या समाजाची गळचेपीकरण्याचे काम येथील समाज रचनेने केलेले होते. कुत्र्या मांजरांना अंगाखांद्यावर खेळवणारी ही संस्कृती अण्णावाचून माणसाला जिवंत जाळणारी ही संस्कृती या संस्कृती विरुद्ध प्रत्येक माणसाच्या मनामध्ये चीड निर्माण करून इथली ही जुलमी राजवट जुलमी धर्म सत्ता उलटवून टाकली पाहिजे हा बाबासाहेब आंबेडकरांचा विचार प्रत्येक माणसाने आपल्या हृदयामध्ये कोरून या भारत देशामध्ये मानवतावादी विचारांची जपणूक करण्यासाठी डॉक्टरबाबासाहेब पाहिजे व त्यासाठी सर्व दलितांनी एकत्र येऊन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची विचार या समाज म नावर समाज हृदयामध्ये रुजवण्याचं काम केलं पाहिजे आदरणीय धम्मानंदजी मुंडे नावाचं



वादळ परळी शहरांमध्ये नाहीतर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये दलित पँथरच्या चळवळीने निर्माण केलं या फुले आंबेडकरी चळवळीच्या वैचारिक वादळाने आपल्या कर्तुत्वाने अनेक जातीयवादी धर्मवादीजुलमी अन्यायअत्याचार करणाऱ्या पालापाचोळ्याला कायमचं नष्ट करण्याचं काम केलं डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या विद्रोही बंडखोरक्रांतिकारी अन्याय अत्याचाराविरुद्ध सतत संघर्ष लढा पुकारण्याची विचारधारा प्रत्येक माणसाने अंगीकारून येथील समाज रचनेला धर्म वादी जातीयवादी सनातनी बुरसटलेल्या विचारधारेला हलवण्याचे काम केलं त्याच विचारसरणीला अंगीकरून धम्मानंदजी मुंडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी परळी शहरांमध्ये सामाजिक समतेचे तत्त्वज्ञान प्रत्येक माणसाच्या हृदयामध्ये पेरण्याचं काम केलं डॉक्टर बाबासाहेबआंबेडकरांनी दिलेले समतेचा ममतेचे बंधुत्वाचं न्यायाचं तत्व अंगीकरून या भारत देशाला सुजलाम सुफलाम करण्यासाठी प्रयत्न करण्याचं काम केलं अनेक वर्षापासून या बीड जिल्ह्यामध्ये आपल्या कार्याच्या सूर्यप्रकाशाने अनेक अन्याय अत्याचार सहन करणाऱ्या दलित बांधवांच्या अंधाकार मय जीवनाला प्रकाशमय करण्याचे काम करणारा परळी परिसरामध्ये व या तालुक्यामध्ये ज्या ज्या ठिकाणी दलित समाजावर अन्याय त्याच्यावर होत असेल त्या अन्याय अत्याचाराविरुद्ध प्रतिकार करून तेथील दलित माणसांना मानसिक दृष्ट्या आर्थिक दृष्ट्या सबळ करण्याचे काम करणारा अनेक लोकांच्या जीवनाला कलाटणी देण्याचे काम करणारा अनेक विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक कार्यात मदत करून त्यांचे जीवन करण्यासाठी प्रयत्नशील असलेला या परळी परिसरामध्ये स्वाभिमानी चळवळ जिवंत ठेवण्यासाठी स्वतःच्या जीवाची बाजी लावणारा आपल्या शाहिरीच्या माध्यमातून मस्त झालेल्या दलित समाजाला आपल्या वाणीने बाबासाहेब आंबेडकरांचे विचारधारेने क्रांतीची मशाल हाती देऊन क्रांती करण्यास भाग पाडणारा या समाजाला खरोखरच प्रत्येक गोष्टीमध्ये सहकार्य करणारा रात्र असो दिवस असो कोणत्याही वेळी प्रत्येक माणसाच्या सुख दुःखामध्ये सक्रिय सहभागी होणारा दलित समाजाच्या प्रत्येक अडीअडचणीला संकटमोचनाची भूमिका निभावणारा एक महान पँथर ज्या पँथरने भारतीय दलित पँथरच्या माध्यमातून आपल्या सामाजिक कार्याच्या माध्यमातून अनेक लोकांना स्वाभिमानी बनवण्याचे काम केलं बाबा साहेब आंबेडकरांच्या विचारधारेकडे वळवण्याचं काम केलं अनेक लोकांना भगवान गौतम बुद्धाच्या महान विचारांची म्हणती सांगून त्यांना बौद्ध धर्मामध्ये आणण्याचे काम केलं अनेक गोरगरीब लोकांना सहारा देण्याचं काम केलं दलित चळवळीचा लखलखता अंगार बनून अनेक लोकांना आपल्या कार्याने नामोहर करण्याचे काम केलं अनेक कार्यकर्ते आदरणीय धमानंद मुंडे यांनी निर्माण केले या कार्यकर्त्यांनी निस्वार्थीपणाने समाज हितासाठी समाजाच्या भल्यासाठी उन्नतीसाठी समाजाच्या सामाजिक चळवळीमध्ये सक्रिय सहभाग घेऊन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा प्रत्येक माणसाच्या मनामनामध्ये घराघरांमध्ये घरे खोऱ्यामध्ये पोहोचवण्याचे काम केलं माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांच्या हाती फुले आंबेडकर चळवळीची मशाल देऊन ही मशाल जिवंत ठेवण्याचे काम करा हा संदेश देऊन या समाजाला आदर्श असा महान नेता म्हणून त्याची ओळख निर्माण करून गेला ज्याने अनेक लोकांच्या अंधकारमय जीवनाला प्रकाशमय करण्याचं काम केलं अनेक कार्यकर्ते या समाजाला देण्याचे काम केलं ज्या कार्यकर्त्यांनी समाजाच्या हितासाठी आपलं जीवन सर्वस्व अर्पण करण्याचे काम केले अशा अनेक निस्वार्थी कार्यकर्त्यांचा आधार आदरणीय धम्मनंदजी मुंडे होते धम्मानंदजी मुंडे यांच्या कार्याने अनेक लोक प्रभावित होऊन त्यांच्या कार्याचा गौरव अनेक ठिकाणी केला जातो आदरणीय धम्मानंदजी मुंडे यांच्यासारखा नेता पुन्हा होणे नाही त्यांनी या समाजाला दिलेली शिकवणूक समाजासाठी केलेला त्याग नामांतराच्या लढ्यामध्ये एक वाघाची भूमिका निभावणारा अन्याय अत्याचार करणारा च्या नरडीचा घोट घेणारा वाघ फुले आंबेडकरचळवळी च्या विचारधारेसाठी स्वतःचं आयुष्य या समाजाला समर्पित करणारा आदरणीय धम्मानंदजी मुंडे जरी आज आपल्यात नसली तरी त्यांच्या कार्याचा आवाका इतका प्रचंड आहे की प्रत्येक माणसाच्या घराघरांमध्ये आजही आदराने धम्मानंद मुंडे यांचे नाव घेतले जाते परळी परिसरातील अनेक कार्यकर्त्यांचे आदर्श म्हणून धम्मानंदजी मुंडे यांच्याकडे पाहिले जाते त्यांनी केलेलं जे कार्य आहे ते कार्य परळी परिसरातील कोणताही दलित माणूस विसरू शकत नाही त्यांनी केलेल्या उपकाराच्या ओझाने आम्ही अत्यंत विनम्रपणे वाकुनगेलेले आहेत त्यांच्या कार्याची मशाल आजही आम्ही आमच्या मनात ज्वलंत ठेवलेली आहे धम्मानंदमुंडे यांचा विचार प्रत्येक माणसाच्या घराघरांमध्ये रुजलेला आहे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा आजही जिवंत ठेवण्याचं काम धम्मानंद मुंडे यांच्या रूपाने आम्ही करत आहोत धम्मानंदजी जरी आज तुम्ही आमच्यात नसलात तरी प्रत्येक माणसाच्या हृदयामध्ये धम्मानंद मुंडे आहे तुम्ही केलेल्या कार्याला तुम्ही दिलेल्या समाजाच्या योगदानाला तुम्ही नामांतराच्या लढ्यामध्ये दिलेलं योगदान आपण गायरानजमिनी मिळावे यासाठी काढलेले मोर्चे या समाजात अनेक लोकांवर केलेले उपकार इथला कोणताही माणूसकधीच विसरणार नाही आदरणीय दमानं जी मुंडे साहेब तुम्ही ज्या काळात या समाजासाठी लढलात तो काळ अत्यंत वाईट परिस्थितीचा काळ होता त्या काळामध्ये दलित समाजाची परिस्थिती अत्यंत हलाखीची वजन होते त्या काळामध्ये दरीत समाधान चारी बाजूने कोंडलेला होता आर्थिक दृष्ट्या दुर्बल होता प्रत्येक क्षेत्रामध्ये जरी समाजाची गळचेपी झालेली होती त्या काळामध्ये खेड्यापाड्यामध्ये दलित समाजावर अत्यंत झाले या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी पँथरच्या माध्यमातून तुम्ही दलित समाजाची ढाल झालेले होतात ज्या ज्या वेळेस दलित समाजावर अन्याय अत्याचार झालेला होता त्यावेळेस तुम्ही त्यांना अत्याचाराविरुद्ध आवाज उचलण्याचे काम केले आपल्यावर देखील अनेक वेळा वाईट प्रसंग आले होते आपण समाजाचं काम करत असताना आपल्याला बदनाम करण्याचं काम देखील झालं परंतु सत्य हे सत्यच असते सत्य हे अजरामर असते सत्य हे मरत नसते धम्मानंद मुंडे तुम्ही केलेल्या समाजासाठी कार्य दिलेलं योगदान दलित समाजात कदापि विसरू शकत नाही जोपर्यंत सूर्य तारे आहे तोपर्यंत परळी परिसरातील दलित समाज तुम्हाला विसरू शकत नाही तुमच्या आजरामरकार्याला तुमच्या विचार धारेला तुमच्यासारख्या डरकाळी फोडणाऱ्या पँथरला मानाचा क्रांतिकारी जय भिमधम्मानंदजी मुंडे तुमच्या कार्याला सलाम क्रांतिकारी जय भिम



**ॲड. उजगरे मामा**



आज आपल्या ज्ञानसागर गुरुकुल बीडमध्ये रक्षाबंधन कार्यक्रम अतिशय उत्साह मध्ये पार पडला. ज्ञानसागर गुरुकुल च्या संचालिका सानप यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. सर्व विद्यार्थ्यांना राख्या बांधून, राखीचे महत्व व बहिण भावाचं अतूट नातं, यावर सर्व शिक्षकाने अनमोल असे मार्गदर्शन केले, काही विद्यार्थ्यांनी भाषणामधून आपले विचार व्यक्त केले. तर काही विद्यार्थ्यांनी सुंदर असे गीत सादर केले. ज्ञानसागर गुरुकुल चे संचालक गणेश सानप यांनी बहीण भावाचं नातं यावर अनमोल असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बांगर आदर्श यांनी केले तर आभार प्रदर्शन कदम विश्वजीत यांनी केले.

# आदिवासी लोकांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या संस्कृतीचा आदर करणे काळाची गरज : सुवर्णा गिर्हे



**दौलावडगाव । प्रतिनिधी**

आदिवासी लोकांचे हक्क, त्यांची संस्कृती, आणि त्यांचे पर्यावरणातील योगदान यांचे संरक्षण करणे आणि त्यांचे महत्त्व लोकांना समजावून सांगणे, त्याच बरोबर जागतिक आदिवासी दिन दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. आदिवासी लोकांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या संस्कृतीचा आदर करणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन जिजाऊ ब्रिगेडच्या विभागीय उपअध्यक्षा सौ.शिवमती सुवर्णाताई गिर्हे यांनी केले.

आष्टी तालुक्यातील पिंपरी घाटा येथे आदिवासी क्रांती दिनानिमित्त एकलव्य याच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी त्या बोलत होत्या. पुढे बोलतांना त्या म्हणाल्या की, हा दिवस, जगभरातील आदिवासी लोकांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या संस्कृतीचा आदर करण्यासाठी साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रांनी १९९४ मध्ये या दिवसाची घोषणा केली, आणि १९९५ पासून जगभरात हा दिवस साजरा केला जातो. आदिवासी लोकांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांच्या संस्कृतीचा आदर करणे काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी पिंपरी गावचे सरपंच मोहन आमटे, घाटा गावचे सरपंच प्रल्हाद मुळीक, माजी सरपंच अशोक वायभासे, ग्रामपंचायत सदस्य दादा वायभासे, विकास आमटे, डॉ.बाळासाहेब गिर्हे, युवानेते विलास शिरसाठ, रावसाहेब पिंपळे, राजू माळी, हौसराव पिंपळे, भास्कर पिंपळे, गोकुळ पिंपळे, विजू माळी, गणेश माळी, महादेव माळी याच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# गोरगरिबांच्या अतिक्रमणावर हातोडा पण भूमाफियांना पायघड्या

## शासकीय कर थकविणाऱ्यांना मोकळीक; नगरपरिषद प्रशासनाचा अजब कारभार

**बीड । प्रतिनिधी**

काल दि.०९ शनिवार रोजी नगरपालिका प्रशासनाने बीडमधील वाहतुकीचा अडथळा दूर करण्यासाठी ३ तासात ५० गोरगरिबांच्या अतिक्रमणाच्या नावाखाली पोटावर पाय दिला. उपमुख्यमंत्री अजित पवार बीड दौऱ्यावर आले की नगरपालिकेकडुन शहरातील गोरगरिबांच्या चहाचे हातगाडे, टपरीधारक, छोटे मोठे दुकानदार, फळ विक्रेते, हातावर पोट भरणारे यांचे वाहतुकीस अडथळा ठरणारे अनाधिकृत अतिक्रमणाच्या नावाखाली पोटावर पाय देणारी नगरपालिका बीड शहरातील राखीव असलेल्या शहरातील खुल्या जागा काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या संगनमताने हडपण्यात आल्या असुन त्यावर कधी कारवाई करणार तसेच नगरपालिका हद्दीतील ३२ शासकीय कार्यालयांकडे पालिकेचा तब्बल पावणे ३ कोटी रूपयांचा सरकारी कर थकला असुन कधी वसुल करणार असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला असुन जिल्हा प्रशासन आणि नगरपालिका प्रशासनाच्या विरोधात मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

**उद्यान, मंदिरांसाठी राखीव असलेल्या शहरातील खुल्या जागा हडपणाऱ्यांवर कारवाई कधी?**

प्लॉटिंग व बांधकाम करताना उद्यान, मंदिरासाठी राखीव असलेल्या शहरातील खुल्या जागा काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या संगनमताने भुमाफियांनी गिळंकृत केल्या आहेत. विशेष म्हणजे नगरपालिका, नगररचनाकार, भूमी अभिलेख या तिन्ही कार्यालयातील व्यक्तींच्या मदतीने भूमाफिया आणि नगरपालिकेतील पदाधिकाऱ्यांनी संगनमताने या जागा स्वतःच्या नावावर करून घेतल्या आहेत. बनावट पीटीआर, पीआर कार्ड देखील तयार करण्यात आले आहेत. या प्रकरणी कधी कारवाई करणार असा सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी केला आहे.

**जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक कार्यालयासह ३२ शासकीय कार्यालयांकडे थकलेला कर नगरपालिका कधी वसुल करणार? : डॉ.गणेश ढवळे**

बीड नगरपालिका हद्दीतील जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, महावितरण, जिल्हा न्यायालय, बीएसएनएल, शासकीय कार्यालयांकडे पालिकेचा तब्बल २ कोटी ८७ लाख रुपयांचा कर थकला आहे यात पोलीस अधीक्षक जिल्हाधिकारी कार्यालय अशा प्रमुख कार्यालयांचा समावेश आहे यांच्याकडील थकीत कर नगरपालिका कधी वसुल करणार की केवळ गोरगरीब जनतेवर कारवाई करण्यातच मर्दुमकी गाजवणार असा सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी विचारला आहे.





बीड शहरातील शिवाजीनगर पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक शितल कुमार बल्लाळ साहेब यांनी गोरगरिबाच्या मुली सोबत रक्षाबंधन साजरे केले.

# इंदापूर चे प्रतिनिधी गणेशराव धनवडे (दिव्यांग) यांच्या घरी रक्षाबंधन सन उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**




रक्षाबंधन भाऊ-बहिणीचे अतूट नाते रेशमी धाग्यांनी विणणारा सण रक्ता नात्याची असो वा मानलेली. नातं हे प्रेमाचं नितळ आणि निखळ बंधन. परिपूर्ण दृश्ये टिपण्यासाठी जसे दोन्ही डोळ्यांची आवश्यकता असते, त्याचप्रमाणे दोघांच्या उत्सवात रंगछटा जोडण्यासाठी, बहिणींची उपस्थिती महत्त्वाची असते.

याच रक्षाबंधन या सणाचे अवचित्य साधून निमसाखरचे श्री गणेशराव धनवडे यांच्या घरी त्यांच्या बहिणी सौ वैशाली इंगवले (कराड), सौ सुनीता कदम (कळंब) व सौ अनिता कदम (बारामती) यांनी श्री संतोष धनवडे श्री वीरधवल धनवडे श्री विलास धनवडे यांना रक्षा रुपी धागा बांधून रक्षाबंधन साजरा केला. सर्वांनी बहिणीच्या दीर्घायुष्याची व रक्षणाची प्रार्थना केली. यावेळी निमसाखरचे श्री गणेशराव धनवडे हेही उपस्थित होते. यांनीही आपल्या बहिणींना दीर्घ आयुष्य लाभो यासाठी शुभेच्छा दिल्या.

# लातुर येथे स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांच्या पूर्णकृती पुतळ्याचे सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण

**लातुर । प्रतिनिधी**



लातूर जिल्हा परिषदे च्या मुख्य इमारतीच्या प्रांगणात लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते व इतर अनेक महायुतीतील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवार दि.११ ऑगस्ट २०२५ रोजी करण्यात येणार असल्याची माहिती भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

महाराष्ट्राचे लोकनेते केंद्रीय ग्रामविकास माजीमंत्री स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांचा पूर्णकृती पुतळा लातूर जिल्हा परिषदेच्या मुख्यालय इमारत परिसरात उभारण्यात आला असून शासकीय जागेत मुंडे साहेबांचा लातूर येथे बसवण्यात आलेला पुतळा कदाचित महाराष्ट्र राज्यातील पहिलाच असेल अशी माहिती देऊन भाजपा नेते आ रमेशआप्पा कराड म्हणाले की, भव्य दिव्य उभारण्यात आलेल्या या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण येत्या दि.११ ऑगस्ट २०२५ सोमवारी सकाळी १० वाजता राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते होणार आहे. या अनावरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शिवेंद्रसिंह राजे भोसले हे राहणार आहेत. तर याप्रसंगी राज्याचे ग्रामविकास मंत्री ना. जयकुमार गोरे, राज्याच्या पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई मुंडे, सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील, माजी कृषीमंत्री आ. धनंजयजी मुंडे, माजी युवक कल्याण व क्रीडामंत्री आ.संजय बनसोडे माजी पालकमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, औश्याचे आमदार अभिमन्यू पवार, मराठवाडा शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार महा मंडळाचे अध्यक्ष गोविंद अण्णा केंद्रे, भाजप नेत्या अर्चनाताई पाटील चाकूरकर, शिवसेना संपर्कप्रमुख अँड. बळवंतराव जाधव, भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन दाणे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अफसर शेख, शहर जिल्हाध्यक्ष मकरंद सावे, रिपाई जिलाध्यक्ष बाबासाहेब कांबळे यांच्यासह महायुतीचे अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या पुतळा अनावरण कार्यक्रमास जिल्हाभरातील भाजपा सह महायुतीतील सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिकारी कार्यकर्त्यांनी त्याचबरोबर मुंडे साहेबा वर प्रेम करणाऱ्या सर्व संबंधितांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे असेही आवाहन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले आहे.



गेवराई: तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना कानडा पिंपळगाव गावातून शाळेला जाण्यासाठी बस सेवा सुरू केल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने चालक, वाहकांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच गणपत धापसे जुबेर पटेल, शेख अतिक, निसार पटेल, शाकीर पठाण, साळुंखे सर, मेंडके सर, लियाकत शेख, भास्कर मंचरे यांच्यासह शिक्षक राजेश कुमार पंडित, खाडपसर, सतीश बहीर आदि.

# समाजसेवक परमेश्वर घोडके यांचा पर्यावरण जपणारा अनोखा रक्षाबंधन सोहळा

**दौलावडगाव । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील मोजे सुलेमान देवळा परिसरात, रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त एक आगळावेगळा सोहळा साकारला. समाजसेवक परमेश्वर रामचंद्र घोडके यांच्या संकल्पनेतून झाडं म्हणजेच जीवन, आणि जीवन म्हणजेच नातं हा संदेश देत, त्यांच्या शेतात नव्याने लावलेल्या रोपांना राखी बांधून त्यांचे संगोपन करण्याची पवित्र प्रतिज्ञा घेण्यात आली. सकाळच्या मंद वाऱ्याच्या झुळकीत, ओल्या मातीत बांबू, चिंच, शिवण, जांभूळ यांसारखी उपयुक्त आणि सावलीदार वृक्षांची रोपे रोवली गेली. त्या प्रत्येक रोपाला राखी बांधताना जणू मानवी मन आणि निसर्ग यांच्यातील अदृश्य बंध अधिक घट्ट होत होते. संत तुकाराम महाराजांच्या वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या अभंगातील तत्वज्ञान प्रत्यक्ष कृतीत उतरले होते.



परमेश्वर घोडके यांनी अगदी मार्मिक शब्दांत सांगितले, जेव्हा उन्हाळ्यात तापमान ४५ अंशांच्या वर चढतं, तेव्हा सावलीसाठी झाडांची आस लागते. जेव्हा श्वास घ्यायलाही त्रास होतो, तेव्हा ऑक्सिजनची किंमत कळते. पण खरी शहाणपणाची वेळ ती आहे, जेव्हा संकट येण्याआधीच झाडं लावली जातात. झाडं असतील तरच श्वास आहे, सावली आहे, आणि भविष्यातील पिढ्यांसाठी आशा आहे. या उपक्रमात समविचारी सामाजिक कार्यकर्ते आणि शासन यंत्रणेतील अधिकारीही सहभागी झाले. त्यात वनरक्षक कल्पना विधाते, कृषी सहाय्यक संदीप सुंबे, युवा नेते धुळा बाबासाहेब लकडे, स्वप्नील पोटे, ईश्वर ओव्हाळ, दीपक शिंदे, साईनाथ भोजे, ज्येष्ठ नागरिक बाबासाहेब बापू लकडे, यशदीप घोडके यांचा समावेश होता. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्वांनी एकमुखाने ठरवलं घरोघर एक तरी झाड लावू, त्याचं संगोपन आयुष्यभर करू. राखीच्या या पवित्र धाग्याला आज निसर्गरक्षणाची नवी अर्थवत्ता लाभली होती. हा उपक्रम केवळ प्रतीकात्मक नव्हता; तो होता आगामी पिढ्यांसाठी हिरव्या भविष्याची बीजं रोवण्याचा खरा प्रयत्न.



# जि प प्रा शाळा देवडी येथे महाराष्ट्र आधार सेना उपस्थितीत रक्षाबंधनाचा कार्यक्रम साजरा

**वडवणी । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवडी फाटा येथे झाडाला राखी बांधून झाडांचे महत्व सांगून प्रत्येकाने एक झाड लावावी व रक्षाबंधनाचा दिन साजरा करावा अस मुख्याध्यापक सरांनी विद्यार्थ्यांना समजून सांगितले व विशेष म्हणजे पडत्या पावसामध्ये हा कार्यक्रम जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक यांनी आयोजित केला. त्यावेळी प्रमुख उपस्थिती महाराष्ट्र आधार सेनाचे विद्यार्थी वडवणी तालुका अध्यक्ष अभिषेक अडागळे, मुख्याध्यापक बगाडे, सहशिक्षक खटावकर, शेख, सुरवशे, मोरे, वरुडे, शेख आणि ट्रेनी टीचर पुरी, प्रनील अडागळे, रानुजी कांबळे ईत्यादी उपस्थित होते.

# विद्यार्थिनींनी झाडांना राख्या बांधून दिला पर्यावरण रक्षणाचा संदेश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

भारतीय संस्कृतीत महत्वाचा मानला जात असलेला राखी पौर्णीमेचा सण देशात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. या दिवशी बहिणी प्रेमाचे प्रतिक म्हणुन भावांना राख्या बांधतात आणि बहिणीचे रक्षण करावे तसेच त्यांच्या प्रिय भावास दीर्घायुष्य लाभावे, यासाठी देवाकडे प्रार्थना करतात नेमका हाच संदेश वापरून योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित श्रीमती गोदावरीबाई कुंकूलोळ योगेश्वरी कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी निसर्ग संवर्धन मंडळातंर्गत प्राचीन वृक्षांना म्हणजेच मातृवृक्षांना राख्या बांधून वृक्ष आमचे भाऊ असून ते दिर्घायुषी व्हावे व प्रदूषणाच्या दैत्यापासून आमचे रक्षण करावे अशी प्रार्थना केली.



वसतीगृहाचे गृहपाल, शिक्षिका यांच्या मार्गदर्शनात हा आगळा वेगळा उपक्रम राबवुन वृक्ष संवर्धनाचा संदेश देण्यात आला. सर्वत्र होणाऱ्या वृक्ष तोडीमुळे निसर्गाचा समतोल बिघडला परिणामी ग्लोबल वार्मिंगचा प्रश्न जागतिक समस्या बनली. यावर उपाय म्हणुन वृक्ष लागवडी सोबतच वृक्षसंवर्धनाची गरज ओळखुन या विद्यार्थीनी राखीपौर्णिमे निमीत्त परिसरातील वृक्षांना वृक्षरक्षा बंधन करण्यात आले. सदर उपक्रम केवळ औपचारिकता म्हणुन न राबविता वेळोवेळी या वृक्षांच्या सुरक्षिततेची खात्री करून व वेळ पडल्यास त्यांच्या सुरक्षिततेसाठी संघर्ष करण्याचा मानस सुद्धा विद्यार्थिनींनी यावेळी व्यक्त केला. रक्षाबंधनासाठी विद्यार्थीनींनी पर्यावरणाला हानीकारक असणाऱ्या घटकांना वगळुन वृक्ष रक्षाबंधन केले. याप्रसंगी निसर्ग संवर्धन मंडळ, योगेश्वरी विद्यार्थी वसतीगृह यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# भावंडांच्या नात्याचा सण 'रक्षाबंधन' उत्साहात साजरा

**केज । प्रतिनिधी**

प्रेम, जिव्हाळा आणि संरक्षणाच्या वचनाचा पवित्र सण 'रक्षाबंधन' आज राज्यात उत्साहात साजरा करण्यात आला या सणाची मुळे प्राचीन कथांमध्ये आढळतात. महाभारतातील कथा सर्वाधिक प्रसिद्ध आहे. जेव्हा द्रौपदीने श्रीकृष्णाच्या जखमी हाताला आपल्या साडीचा तुकडा फाडून बांधला, तेव्हा कृष्णाने तिला सदैव संरक्षण देण्याची शपथ घेतली. त्याचप्रमाणे, ऐतिहासिक काळात मेवाडची राणी कर्णावतीने गुजरातच्या बादशहा हुमायूँला राखी पाठवून मदतीची विनंती केली होती, आणि हुमायूँने आपले साम्राज्य सोडून तिच्या रक्षणासाठी धाव घेतली होती.



आजही ही परंपरा भावंडांमधील प्रेम, विश्वास आणि रक्षणाचे प्रतीक म्हणून जपली जाते. बहिणीने आपल्या भावाच्या मनगटावर राखी बांधून त्याच्या दीर्घायुष्याची व सुख समृद्धीची प्रार्थना केली, तर भावाने बहिणीचे आयुष्यभर रक्षण करण्याची शपथ घेतली. सकाळपासूनच बाजारपेठांमध्ये राख्या, गोडधोड व भेटवस्तू खरेदीसाठी गर्दी पाहायला मिळाली. पारंपरिक पद्धतीने पूजा करून राखी बांधल्यानंतर भावंडांनी एकमेकांना मिठाई भरवून सणाचा आनंद लुटला. काही ठिकाणी लहान मुलांनी व ज्येष्ठांनीही हा सण साजरा करून कुटुंबातील एकात्मतेचा संदेश दिला.

या निमित्ताने अनेक सामाजिक संस्थांनी अनाथालये व वृद्धाश्रमात जाऊन रहिवाशांच्या मनगटावर राखी बांधून त्यांना कुटुंबाचा उबदारपणा जाणवून दिला. तसेच, पोलिस, सैनिक व आरोग्य सेवकांना राखी बांधून त्यांच्या सेवेला सलाम करण्यात आला. राज्यातील विविध भागांत हा सण आपापल्या पारंपरिक पद्धतीने आणि आनंदमय वातावरणात पार पडला.

# राखी पौर्णिमेनिमित्त नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदनात भारतीय जवान व पोलीस बांधवांसोबत भावबंधाचा उत्सव संपन्न

## खा.बजरंग सोनवणे यांच्या संकल्पनेतून शितलताई लांडगे यांनी बांधली राखी



**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

भावंडांच्या प्रेमाचा आणि संरक्षणाच्या वचनाचा प्रतीक असलेला 'रक्षाबंधन' सण, यंदा नवी दिल्ली तील महाराष्ट्र सदनात एक वेगळ्याच भावनिक वातावरणात साजरा झाला. महाराष्ट्रातील सुपुत्र भारतीय सैन्य आणि पोलीस दलात सेवेत असताना देशसेवेचे आपले कर्तव्य पार पाडत आहेत. मात्र, या कर्तव्यामुळे त्यांना आपल्या कुटुंबापासून, विशेषतः बहिणींपासून दूर रहावे लागते. या दूराव्याला आपुलकी चा स्पर्श देण्यासाठी राखी पौर्णिमेनिमित्त महाराष्ट्र सदनात भावनिक सोहळा पार पडला.

खा.बजरंग सोनवणे यांच्या संकल्पनेतून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या केज महिला तालुकाध्यक्ष तथा येडेश्वरी फाउंडेशनच्या प्रमुख सौ.शितलताई लांडगे व महाराष्ट्रीय बहिणींनी उपस्थित जवान व पोलीस बांधवांच्या मनगटावर राखी बांधत त्यांच्या आरोग्य, सुरक्षितता व दीर्घायुष्याची प्रार्थना केली. यावेळी सौ.शितलताई लांडगे यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील सुपुत्रांना राखी बांधण्याचे भाग्य मला लाभले, हा दिवस माझ्यासाठी अतुलनीय, पूजनीय आणि अविस्मरणीय आहे.

या कार्यक्रमाच्या दरम्यान महाराष्ट्र सदनातील अधिकारी वर्ग, भारतीय जवान, पोलीस बांधव तसेच यूपीएससी क्लासेसच्या विद्यार्थिनींची उपस्थिती लाभली. राखी बांधल्यानंतर मिठाईचे वाटप करून आणि आपुलकीचे संवाद साधत हा सोहळा अधिकच संस्मरणीय बनला. या अनोख्या रक्षाबंधन उत्सवाने केवळ भावंडांच्या नात्याचा सन्मान केला नाही तर देशरक्षणा साठी सतत सज्ज असलेल्या जवान व पोलीस बांधवांप्रती कृतज्ञतेची भावना अधिक दृढ केली. उपस्थितांच्या मनात आजचा दिवस कायमचा कोरला गेला. या कार्यक्रमाच्या वेळी भावनिक वातावरण निर्माण झाले होते. उपस्थित सैनिकांनी खा.बजरंग सोनवणे आणि बहिणींचे आभार व्यक्त केले आहे.

# दिल्लीत केंद्रीय मंत्र्यांच्या उपस्थितीत होणार एपीजे अब्दुल कलाम युथ अवॉर्ड कार्यक्रम

## प्रदेश प्रभारी सलीम जहाँगीर यांची माहिती

**बीड । प्रतिनिधी**



देशाचे नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील कलाम को सलाम मोहिमेचा एक भाग म्हणून, अल्पसंख्याक मोर्चा अल्पसंख्याक समुदायातील प्रतिभावान व्यावसायिक तरुणांना डॉ. कलाम स्टार्टअप युथ अवॉर्ड २.० पुरस्कार देऊन सन्मानित करणार आहे. दि.१२ ऑगस्ट २०२५ रोजी दिल्लीत हा कार्यक्रम होणार आहे. भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दीकी यांच्या नेतृत्वाखाली देशभरातील अल्पसंख्यांक समाजातील व्यावसायिकांची नोंदणी करण्यात आली असून त्यापैकी महाराष्ट्रातील ५०० अल्पसंख्यांक व्यावसायिकांनी ऑनलाइन नोंदणी करून यात सहभाग घेतल्याची माहिती भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री तथा अभियानाचे प्रदेश प्रभारी सलीम जहाँगीर यांनी दिली.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, मंत्री पंकजाताई मुंडे, डॉ. प्रितमताई मुंडे, राज्य अल्पसंख्यांक मोर्चाचे अध्यक्ष इद्रिस मुलतानी यांच्या नेतृत्वाखाली एपीजे अब्दुल कलाम युथ अवॉर्ड समारोह प्रदेश प्रभारी सलीम जहाँगीर यांनी राज्यातील अल्पसंख्यांक समाजातील व्यावसायिकांची ऑनलाईन नोंदणी करून घेतली आहे. मिसाइल मॅन ऑफ इंडिया म्हणून ओळखले जाणारे भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या १० व्या पुण्यतिथीनिमित्त १२ ऑगस्ट २०२५ रोजी दिल्ली येथे डॉ. कलाम युथ स्टार्टअप अवॉर्ड-२०२५ कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. राष्ट्रीय स्तरावरील स्टार्टअपबद्दल तरुणांना जागरूक करण्यासाठी राष्ट्रीय अल्पसंख्याक मोर्चाने देशभरातील अल्पसंख्याक समुदायातील प्रतिभावान तरुणांना डॉ. कलाम स्टार्टअप युथ अवॉर्ड २.० देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. हा पुरस्कार नवोन्मेष, अपवादात्मक कौशल्ये आणि उद्योजकीय वृत्तीद्वारे स्वतःचे उद्योग सुरू करणाऱ्या आणि समाजासाठी प्रेरणादायी उदाहरण म्हणून काम करणाऱ्या तरुणांना दिला जाणार आहे. दिल्लीत दि.१२ ऑगस्ट २०२५ रोजी होणाऱ्या कार्यक्रमास केंद्रीय मंत्र्यांसह देशभरातील भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याची माहिती भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री तथा अभियानाचे प्रदेश प्रभारी सलीम जहाँगीर यांनी दिली.

# धारूर शहरातील पाईपलाईनच्या नावाखाली रस्त्याचे वाजले तीनतेरा

## मुख्याधिकारी गुत्तेदार पोसण्यात व्यस्त तर इतर कामाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष?

**धारूर । प्रतिनिधी**

धारूर शहरात अनेक नागरिक समस्यामध्ये अडकले असून शहरातल्या रस्त्यांचे तीन तेरा वाजले असून किल्ले धारूर नगरपरिषद उपयोजना न राबवता झोपेचे सोंग घेत आहे. मुख्याधिकारी महेश गायकवाड यांच्याकडे वारंवार शहरातील नागरिकांनी तोंडी व निवेदनाद्वारे आपल्या अडचणी मांडल्या असून धारूर नगरपरिषद सोडवण्यात अपयशी ठरत असल्याचा चित्र दिसत आहे. शहरातील रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत भर पावसाळ्यात त्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचते व नागरिकांना जीवघेणा प्रवास मुठीत धरून करावा लागत आहे. याच पडलेल्या खड्ड्यांमुळे अपघाताचे प्रमाण वाढले असून नागरिकांचे जीव धोक्यात आले आहेत. पावसाळा चालू आहे रोज पडत असलेल्या पावसाने पाणी साचून घाण पाणी रस्त्यावर पसरत असल्याने रोगराई ला आमंत्रण मिळत आहे.

नवीन पाईपलाईनसाठी रस्ते उकारण्यात आले मात्र पुन्हा डांबरीकरन झाले नाही. भर पावसाळ्यात उकडलेल्या रस्त्यांवर चिखलांचा सडा दुर्गंधी पसरून वाहन चालकांना हाल सोसावे लागत आहे या प्रकाराकडे धारूर नगरपरिषदचे मुख्याधिकारी महेश गायकवाड यांचे पूर्णतः दुर्लक्ष आहे. अनेकदा सांगून मुख्याधिकाऱ्यांना जाग येईल अशी अपेक्षा नागरिकांनी ठेवली होती पण ती फेल ठरत आहे.

शहरात विकास होण्याऐवजी प्रशासकीय ढिसाळपणामुळे नागरिकांचे हाल वाढले आहेत. शहरातील रस्त्याचे पार तीन तेरा वाजल्याने बाहेर पावसाळ्यात शहरातल्या जनतेला नाहक त्रास सहन करावा लागत असून या कडे धारूर नगर परिषद प्रशासनाचे दुर्लक्ष आहे पावसाळयात उपयोजना राबवणे आवश्यक असताना कसल्याच प्रकारचे लक्ष नसून चित्र'' विचित्र झाल्याने भर पावसाळ्यात गल्लो गल्लीत पूर्ण शहरात ठिकठिकाणी चिखलांचे सडे तर नाल्या तुडुंब भरून वाहत असल्याने रोडला घाण येऊन धारूर नगरपरिषद चा कारभार चव्हाट्यावर आला असल्याने या धारूरनगर परिषदेचे मुख्यअधिकारी महेश गायकवाड यांचे जाणीवपूर्वक या उपयोजना राबवणे एवजी दुर्लक्ष आहे. किल्ले धारूर नगरपरिषद मध्ये मागच्या तीन वर्षापासून प्रशासकराज आहे. यात मुख्याधिकारी म्हणून महेश गायकवाड हे मागच्या अनेक वर्षांपासून धारूर नगर परिषद मध्ये कार्यरत असून त्यांनी मागच्या अनेक महिन्यांपासून शहरातल्या विकास कामात गती वाढवण्याच्या नावाखाली अनेक विकास कामात टक्केवारी घेऊन गुत्तेदार पोसण्याचे काम गायकवाड करत असल्याने शहरात चर्चा होऊ लागली आहे.




मुख्याधिकारी गायकवाड यांना शहरातले नागरिक वारंवार आपले काम सांगत असतात कोणतेच काम होत नसून निव्वळ गायकवाड यांचे पूर्णतः लक्ष हे टक्केवारीच्या कामांकडे लक्ष असल्याचे चित्र एकंदरीत दिसून येत आहे. तात्काळ पडलेले शहरातील खड्डे मुरुम टाकून बुजवावे नागरिकांची होणारी गैरसोय टाळावी व भर पावसाळ्यातले हाल जनतेचे होत असलेले धारूर नगरपरिषद दूर करून प्रलंबित प्रश्न पूर्ण करून नागरिकांना दिलासा द्यावा अशी नागरिकांतून होऊ लागली.

### एखादे काम तोच गुत्तेदार, तीच एजन्सी हा काय प्रकार; मुख्याधिकारी साहेब स्पष्टीकरण द्या..

शहरातील वारंवार धारूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश गायकवाड हे नेहमी विकासाचा उल्लेख करत असतात त्याच चालू विकास कामात टक्केवारी घेऊन कामाचे ओपन टेंडर न काढता कामे मॅनेज करण्याचा नवा फंडा मुख्याधिकारी यांनी सुरू केला असल्याचे बोलले जात आहे. शहरातील एखादे विकास काम टक्केवारी देऊन बोगस स्वरूपात करायचे असेल तर ठराविक तेच गुत्तेदार व त्याच एजन्स्या कार्यरत असल्याने धारूर नगरपरिषदेच्या कारभारावर प्रश्नार्थक चिन्ह निर्माण होत आहे. धारूर नगरपरिषद अंतर्गत अनेक उपयोजनांचे विभाग असून त्यात कोणतेही काम करायचे असेल तर अधिकारी यांना मॅनेज करून ठराविक लोक आपला खिसा गरम करत आपल्याला विकासाचा पार बट्ट्याबोळ होत आहे तरी हे असेच चित्र कायम राहिले तर नक्कीच अनेक समस्यांचा सामना सह उपयोजनला पासून वंचित नागरिकांना राहावे लागेल. या होत असलेल्या विकासाच्या नावाखाली भ्रष्टाचार मोडीत काढण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वेळीचा लक्ष देऊन भ्रष्टाचार मोडीत आणावा व संबंधित एजन्सी व तेच तेच गुत्तेदार यांचा आणि मुख्याधिकारी यांच्यात काय संबंध आहे त्याचा तपास होणे गरजेचे आहे. शहरातील एक काम आठवडाभरचे असेल तर त्याच कामात पंधरा दिवसाचा वेळ घेऊन एकच व ठराविक लोकांना काम भेटतात व ते संबंधित लोक त्यांच्या सोयीप्रमाणे काम करत असतात या प्रकाराकडे वरिष्ठांनी लक्ष देण्याची मागणी नागरिकांतून होऊ लागली आहे.

# अंबाजोगाई येथे पासपोर्ट सेवा केंद्र स्थापनेची खा.सोनवणेंची केंद्रीय दळणवळण मंत्र्यांकडे मागणी

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यासह अंबाजोगाई परिसरा तील हजारो नागरिकांना पासपोर्ट सेवांसाठी नांदेड, लातूर किंवा पुणे या सारख्या दूरच्या शहरांमध्ये जावे लागते. ग्रामीण भागातील विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि सामान्य नागरिक यांना होणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन अंबाजोगाई येथे पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र (पीओपीएसके) स्थापनेची मागणी खासदार बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांच्याकडे केली आहे.



अंबाजोगाई शैक्षणिक, आरोग्य, प्रशासकीय दृष्टिकोनातून महत्वाची आणि बीड जिल्ह्यातील प्रमुख नगरी आहे. तर जिल्ह्यासह अंबाजोगाई परिसरातील हजारो नागरिकांना पासपोर्ट सेवांसाठी नांदेड, लातूर किंवा पुणे या सारख्या दूरच्या शहरांमध्ये जावे लागते. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि सामान्य नागरिक यांना होणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन अंबाजोगाई येथे पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्र (पीओपीएसके) स्थापन करणे गरजेचे आहे. हे केंद्र स्थापन झाल्यास अंबाजोगाईसह केज, धारूर, परळी, माजलगाव याभागातील लोकांना देखील याचा लाभ होणार आहे. या मागणीचे निवेदन खासदार बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांची दिल्ली येथे भेट घेऊन सादर केले. तर या आपल्या पाठपुराव्या तून लवकरच ही सुविधा अंबाजोगाईत सुरु होईल अशी खात्री ही खासदार बजरंग सोनवणे यांनी व्यक्त केली आहे.



# 'हरित महाराष्ट्र' मोहिमेत आवरगाव ग्रामपंचायत आघाडीवर

**धारूर । प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत आवरगाव ग्रामपंचायतीने 'हरित महाराष्ट्र' या शासनाच्या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला आहे. शासनाच्या नियमानुसार प्रति ग्रामपंचायत किमान १००० झाडे लावणे अपेक्षित असताना, आवरगाव ग्रामपंचायतीने या मर्यादेपलीकडे जाऊन मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून गाव हिरवेगार करण्याचा संकल्प केला आहे.

झाडांचे महत्त्व, बदलत्या हवामानाचे आव्हान आणि निसर्गाचा समतोल राखण्याची गरज लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात आला. लावलेल्या प्रत्येक झाडाची जात, संख्या आणि स्थान याची अचूक नोंद ठठ कोड स्कॅन पद्धतीद्वारे घेऊन पंचायत समितीकडे अहवाल सादर केला जाणार आहे. ही तंत्रज्ञानाधारित पद्धत पारदर्शकता आणि जबाबदारी वाढविण्यास मदत करणार आहे. या उपक्रमासाठी विशेष गटविकास अधिकारी वैजनाथ लोखंडे, सरपंच अमोल जगताप, ग्रामसेवक झोंबाडे, मुख्याध्यापक फरके, पंजाब जगताप, मयूर जगताप, रोहन नखाते, सोनू जगताप, सुरेंद्र नखाते, महादेव जगताप यांच्यासह शाळेतील विद्यार्थी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनीही पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून घेत स्वतः झाडे लावण्याचा संकल्प केला. ग्रामपंचायतीचा हा उपक्रम केवळ गावाची हिरवाई वाढवणार नाही तर पर्यावरणाबद्दल जनजागृतीही निर्माण करणार आहे. 'झाडे लावा – झाडे जगवा' हा संदेश आवरगावातून संपूर्ण परिसरात पोहोचविण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

# केतुरा बेलुरा परिसरामध्ये खाजा बाबा डोंगर या ठिकाणी दिसला बिबट्या

### वन विभाग सतर्क, ग्रामस्थांनी केले आपल्या मोबाईलमध्ये बिबट्याच दृश्य कैद

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील केतुरा बेलुरा परिसरामध्ये खाजा बाबा डोंगर या ठिकाणी आज बिबट्या आढळल्याचे दिसून आले. सदरील परिसरातील ग्रामस्थ आपल्या शेतामध्ये काम करत असताना एक जणाला अचानक डोंगराच्या शेजारी असलेल्या शेतामध्ये तो शेतकरी काम करत असताना त्याला अचानक बिबट्या दिसला त्यांनी सदरील आपला मोबाईल काढला आणि सदर बिबट्याचे दृष्ट्य आपल्या मोबाईलमध्ये कैद केले.



सदर व्हिडिओ प्रचंड प्रमाणात व्हायरल झाला आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांना जाग आली, सध्या वन विभागाचे अधिकारी गावी त्या परिसरामध्ये तळ ठोकून आहेत व ग्रामस्थांना भिऊ नका व आप आपले जनावरे लहान मुले व्यवस्थित सुरक्षित ठेवा असे आव्हान वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी केले. यावेळी केतुरा बेलुरा परिसरातील सामाजिक कार्यकर्ते अनिकेत घारगे यांनी परिसरातील ग्रामस्थांना भिऊ नका सतर्क रहा सुरक्षित रहा काम असेल तरच घराबाहेर पडा असे आव्हान अनिकेत घारगे यांनी केले.

# पक्षाचा विचार न करता मुस्लिम समाजाचा विचार करावा तरच नगराध्यक्ष मुस्लिम होऊ शकतो : शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहराच्या नगराध्यक्ष पदासाठी पक्षाचा विचार न करता मुस्लिम समाजातील सर्व नेते, कार्यकर्ते, समाजातील विचारवंत यांनी एकत्र येऊन समाजाचा विचार करून एका योग्य उमेदवाराचे समर्थन करावे तरच नगराध्यक्ष पद मुस्लिम समाजाचे होईल.

अन्यथा समाजातील काही गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असलेले अनेक भावी नगराध्यक्ष किंवा चमकोगीरी करणारे नेते जर स्वतःची पोळी भाजण्यासाठी जर नगराध्यक्ष पदाच्या शर्यतीत सर्व उभे राहतील तर ''दोन मांजरीच्या भांडणात माकडाचा फायदा झाल्याशिवाय राहणार नाही'' खरंच बीडच्या मुस्लिम नेत्यांना समाजाहिताचे काही घेणे देणे असेल तर त्यांनी एकत्र येऊन बैठक घेऊन एकच योग्य उमेदवार उभा करावा हीच अपेक्षा जनतेची आहे.

# १५ ऑगस्ट 'डिजिटल इंडिया फाऊंडेशन डे' जाहिर करा

### खा.बजरंग सोनवणे यांची पंतप्रधान नरेंद्र मोंदींकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

भारताच्या इंटरनेट युगाला ३० वर्षे पूर्ण झाले असून १५ ऑगस्ट हा 'डिजिटल इंडिया फाउंडेशन डे' जाहीर करण्याची मागणी खा.बजरंग सोनवणे यांची पंतप्रधान नरेंद्र मोदी व संचारमंत्री ज्योतिरादित्य राजे शिंदे यांच्याकडे केली आहे.

बीडचे खा.बजरंग सोनवणे यांनी पत्रात म्हटले आहे की, भारतामध्ये सार्वजनिक इंटरनेटसेवा सुरू होऊन यंदा ३० वर्षे पूर्ण होत आहेत.१५ ऑगस्ट १९९५ रोजी विदेश संचार निगम लिमिटेड मार्फत सार्वजनिक इंटरनेटचा शुभारंभ झाला होता. या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय संचार मंत्री यांना पत्र लिहून १५ ऑगस्ट २०२५ हा दिवस 'डिजिटल इंडिया फाउंडेशन डे' म्हणून साजरा करण्याची मागणी केली आहे. सन १९८६ साली



सुरु झालेली भारताची डिजिटल क्रांती ही केवळ व्यापारापुरती मर्यादित नव्हती, तर ती शिक्षण, संशोधन व आत्मनिर्भर भारताच्या दिशेने टाकलेले एक दूरदृष्टीपूर्ण पाऊल होते. त्यांनी आपल्या पत्रात भारताच्या इंटरनेट प्रवासातील काही महत्त्वाचे टप्पे अधोरेखित केले आहेत १९८६ शिक्षण व संशोधन संस्थांसाठी इंटरनेट सेवा, १९८७ जिल्हास्तरावर शासन व नियोजन संस्थांना कनेक्टव्हिटि, १९९५ सार्वजनिक इंटरनेट सेवा सुरू,१९९८ खासगी इंटरनेट कंपन्यांसाठी दरवाजे खुले, २००५ ई-कॉमर्स, टेलिमेडिसिन, ऑनलाईन शिक्षणा साठी गती, २०१६ स्वस्त मोबाइल डेटा, युपीआय आधार या प्रणालींची निर्मिती, २०२५ तंत्रज्ञानात जागतिक नेतृत्वाची दिशा देण्याचे काम झाले आहे. आज भारताचा तरुण आयटी निर्यात, स्टार्टअप्स आणि डिजिटली करणाच्या बाबतीत तो जागतिक नेतृत्वाकडे वाटचाल करत आहे. डिजिटल वाटचाल बाजारपेठेच्या उद्देशाने नव्हे तर सार्वजनिक हित लक्षात घेऊन सुरू झाली होती, आणि आज ती भारताला तंत्रज्ञानाच्या आघाडीवर घेऊन गेली आहे असेही म्हटले आहे.

**खा.सोनवणेंच्या महत्वाच्या मागण्या**

१५ ऑगस्ट २०२५ ला 'डिजिटल इंडिया फाउंडेशन डे' म्हणून मान्यता द्यावी. इंटरनेट, एनआयसी या संस्थांचे योगदान औपचारिकपणे गौरवावे. 'राष्ट्रीय डिजिटल संग्रहालय' स्थापन करून भारताच्या इंटरनेट प्रवासाचे दस्तऐवजीकरण करावे.

# आडस येथे सर्व रोग निदान शिबीर व रक्तदान शिबीर : रमेशराव आडसकर

**केज । प्रतिनिधी**

सत्तरच्या दशकातील केज, अंबाजोगाई तालुक्यातील सहकार, शिक्षण क्षेत्राच्या माध्यमातून विकासाची गंगा खेचुन आणणारे लोकनेते माजी आमदार स्व.बाबुरावजी आडसकर यांच्या कामाच्या माध्यमातून अजुनही शेतकरी, शेतमजूर यांच्या मनात कायम स्मृती आहेत. त्यांचा हाबाडा हा शब्द संपुर्ण महाराष्ट्रात गाजला होता.



लोकनेते माजी आमदार स्व. बाबुरावजी आडसकर यांच्या नवव्यापुण्यतिथी निमित्त दि.१२ आगष्ट २०२५ मंगळवारी छत्रपती शिवाजी विद्यालय आडस या ठिकाणी सकाळी नऊ वाजता सर्व रोग निदान व रक्तदान शिबीर होणार असुन सकाळी अकरा वाजता ह.भ.प. महंत भगवान महाराज शास्त्री वरपगांवकर यांचे पुण्यतिथी निमित्त किर्तन होणार आहे. अशी माहिती अंबा सहकारी कारखाना, अंबाजोगाईचे चेअरमन रमेशराव आडसकर यांनी दिली आहे. या सर्व कार्यक्रमांना व महाप्रसादासाठी केज, अंबाजोगाई, धारूर, वडवणी व माजलगाव तालुक्यातील सर्वांनी उपस्थित राहण्याचे आवाहन रमेशराव आडसकर व ऋषीकेश आडसकर यांनी केले आहे.



# शाळेच्या अडचणी सोडवण्यासाठी प्रयत्न करणार : शंकर देशमुख

**कडा । प्रतिनिधी**

ग्रामीण भागात मुलीची शाळा सुरू करणे हे फार अवघड आहे. पण त्या अडचणीच्या काळात ३५ मुलीवर सुरू केलेली शाळा आज ३५० च्या वर पटसंख्या आहे. संस्था उभा करणं सोप असत, पण ती पुढे नेताना अनंत अडचणीचा सामना करावा लागतो. कड्या सारख्या ग्रामीण भागात या संस्थेचे लावलेले रोपटे आज वटवृक्ष होताना दिसत आहे. शाळेच्या बाबतीत ज्या अडचणी येतील त्या सोडवणयासाठी आम्ही नक्कीच प्रयत्न करू, असे प्रतिपादन भाजपाचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले. लहुजी वस्ताद शिक्षण प्रसारक मंडळ संचलित भगिनी निवेदिता कन्या शाळा कडा ता.आष्टी चा २६ वा वर्धापनदिन शनिवारी कडा येथे आयोजित करण्यात आला होता.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख होते. तर व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष सुनिल देशमुख, माजी सरपंच अनिल (तात्या) ढोबळे, माजी उपसरपंच संपत कर्डीले, भाजपा आष्टी मंडळ अध्यक्ष रमेश गावडे, शिवनेरी पतसंस्थेचे अध्यक्ष नागेश कर्डीले, गोरख कर्डीले, संदिप भळगट, दिलीप परदेशी, भास्कर तारू, प्रकाश देशमुख, दिपक किंबहुने, ज्योती किंबहुने, भाऊसाहेब भोजने, अनिल शिंदे, जयंत खंदारे, बाळासाहेब देशमुख, पत्रकार राजेश राऊत, रघुनाथ कर्डीले, नितीन कांबळे, दिपक गरूड यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी मुख्याध्यापक सुहास देशपांडे, संजय तळेकर, परमेश्वर देसाई, शिवाजी जाधव, चंद्रकला पोकळे, राहुल भोजने, नाना साबळे, बाळू भांगरे, अमोल देशमुख, गोविंद सोले आदींनी परिश्रम घेतले.

शाळास्तरावर घेण्यात आलेल्या धावणे, गोळा फेक, निंबध स्पर्धा यासह विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्त त्या स्पर्धेचे बक्षीस वितरण या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

**मुलींनो अडचणी आल्यावर सांगा, आम्ही सदैव सोबत**

शाळा शिकत असताना मुलींना काही अडचणी आल्या, कोणी टवाळखोरांनी त्रास झाला तर मनात कसलीच भिती न बाळगता आम्हाला बिनधास्त पणे सांगा, आम्ही सोबत असल्याचे माजी सरपंच अनिल ढोबळे यांनी सांगितले.

# शिवसेनेच्या पाठपुराव्याला अखेर यश

## पोलीस ठाण्यातील अंशकालीन सफाई कर्मचाऱ्यांना किमान वेतन देण्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांचे निर्देश

**सिरसाळा । प्रतिनिधी**

गेल्या अनेक दिवसांपासून पोलीस ठाण्यातील सफाई कर्मचारी यांच्यासाठी शिवसेनेच्या वतीने युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली युवासेना विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे, राज्याचे दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडे पोलीस ठाण्यातील सफाई कर्मचाऱ्यांना किमान वेतन मिळावे यासाठी अनेक वेळा निवेदन देऊन सतत पाठपुरावा करत होतो त्याला आज यश आल्याचं युवासेना विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. पुढे दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात कैलास कावरे यांनी म्हटले आहे की, राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी आयोजित केलेल्या बैठकीत मंत्रालयात दिनांक ७/०८/२०२५ बैठकीला पोलीस महानिरीक्षक (प्रशासन) अभिषेक त्रिमुखे, उपसचिव रवींद्र पाटील व तसेच महाराष्ट्र राज्यातील सर्व श्रमिक संघाचे उदय भट, जीवन सुरडे आदींच्या उपस्थिती होती. याच बैठकीत वरील निर्देश दिले आहे.




झालेल्या बैठकीतीत राज्यामध्ये पोलीस ठाण्यामधील आस्थापनेवर कार्यरत असलेल्या रोजनदारी सफाई कामगारांना २७ जानेवारी २०१७ च्या शासन अधिसूचनेप्रमाणे किमान वेतन देणेबाबत देखील मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यात येईल व तसेच कायम असणाऱ्या कामगारांना लाड-पागे समितीच्या शिफारशी लागू करणार असल्याचे सूचना आयोजित बैठकीतीत गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी दिले आहे. गेल्या अनेक दिवसापासून पोलीस ठाण्यातील अंशकालीन सफाई कर्मचाऱ्यांनी यांनी युवासेनेचे विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांच्याकडे शिवसेनेच्या वतीने वरिष्ठांना पाठपुरावा करण्यासाठी शिष्टमंडळाच्या वतीने विनंती करण्यात आली होती. या विनंतीला मान देऊन कैलास कावरे यांनी सातत्याने मागणी लावून धरत सफाई कर्मचाऱ्यांना न्याय मिळून दिला.

यावेळी पोलीस ठाण्यातील अंशकालीन सफाई कर्मचारी यांनी कैलास कावरे यांचे पाठपुरावा बद्दल अभिनंदन केले आहे. पुढे दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात कैलास कावरे यांनी म्हटले आहे की मी सफाई कर्मचाऱ्यांना सतत पाठपुरावा करून न्याय मिळवून दिल्याने मला खूप समाधान वाटत आहे आहे. मी लवकरच राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री व गृहराज्यमंत्री यांची भेट घेऊन सर्व राज्यातील अंशकालीन सफाई कर्मचाऱ्यांच्या वतीने आभार मानणार असल्याचे युवासेना विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT